# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**राज्यातील सेवारत कर्मचा-यांसह सेवानिवृत्त कर्मचा-यांना आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत**

**(१) ३३३४६ (२१-०१-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सेवारत कर्मचा-यांसह सेवानिवृत्त कर्मचा-यांना आरोग्य सुविधा पुरविणे ही शासनाची जबाबदारी असल्याची भुमिका नागपूर खंडपीठाने मांडल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सेवारत कर्मचा-यांसह सेवानिवृत्त कर्मचा-यांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-०९-२०१७) :**(१) सदर प्रश्नात याचिका क्रमांक वादी व प्रतिवादीचे नाव नमुद करण्यात आले नसल्यामुळे शासकीय अधिवक्ता, उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी माहिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे.

(२) राज्यातील सेवारत कर्मचाऱ्यांसह सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपुर्तीची विमाछत्र योजना शासन निर्णय क्रमांक महाराष्ट्र शासन, वित्त विभाग २०१४-प्र.क्र.४०/२०१४/कोषा प्रशा-४, दि.२५ जून, २०१५ अन्वये लागू करण्यात आली आहे.

सेवारत कर्मचाऱ्यांना शासकीय आरोग्य संस्थामध्ये मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. तसेच शासकीय नियमानुसार शासकीय किंवा खाजगी आरोग्य संस्थामध्ये घेतलेल्या उपचारावरील खर्चाची प्रतिपुर्ती त्यांना अनुज्ञेय आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**महाराष्ट्रातील मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण २५ टक्के असल्याबाबत**

**(२) ५४०५५ (२४-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पॉप्युलेशन सायन्सेस' च्या सहकार्याने केलेल्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण सन २०१५-२०१६ च्या चौथ्या अहवालात महाराष्ट्रातील मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण २५ टक्के असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दशकभरात महिला आणि लहान मुलांच्या आरोग्यस्थितीत सुधारणा झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रात अशाप्रकारची बाब केंद्रीय सर्वेक्षणातून महिला व लहान मुलांच्या आरोग्यावर होणारा दुष्परिणाम लक्षात घेता राज्य शासनाने सदर प्रश्नी कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

NFHS-३ (२००५-०६) च्या सर्व्हेक्षणाच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्यात २० ते २४ वर्ष वयोगटातील ज्या महिलांचे वयाच्या १८ वर्षापूर्वी लग्न झाले आहे, अशा मातांचे प्रमाण ३९.०० टक्के होते. तसेच NFHS-४ (२०१५-१६) च्या सर्व्हेक्षणाच्या अहवालानुसार अशा मातांचे प्रमाण २५.१ टक्के आढळले म्हणजेच मुलीचे विवाह १८ वर्षापेक्षा कमी असताना होण्याचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते.

(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्व्हेक्षण अहवाल (NFHS) २००५-०६ व २०१५-१६ नुसार माता आरोग्य मुख्य निर्देशांकामध्ये बऱ्याच पटीने सुधारणा झाली आहे.

आसीएच-२ निर्देशाकांच्या उद्दीष्टांची स्थिती.

| निर्देशांक | राज्याची उद्दीष्टे | | |
|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
| माता मृत्यू दर | ६३ | ५७ | ४७ |
| ५ वर्षा खालील मृत्यूदर | २३ | २१ | १७ |

सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ आरसीएच-२ निर्देशांक उद्दिष्टानुसार माता मृत्यूदर तसेच ५ वर्षाखालील बालकांच्या मृत्यूदरात घट झाली आहे. सबब, महिला व लहान मुलांच्या आरोग्यामध्ये सुधारणा झाली आहे.

(३) माता व बालकांकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध योजना पुढील प्रमाणे आहेत - १) जननी सुरक्षा योजना, २) जननी शिशू सुरक्षा योजना, ३) एस.एन.सी.यु. व एन.बी.एस.यु. ४) किशोर स्वास्थ कार्यक्रम, ५) विकली आयर्न फॉलिक ॲसिड सप्लिमेंटेशन योजना, ६) नॅशनल आयर्न प्लस इनिशिएटिव्ह (NIPI) या सर्व योजनाअंतर्गत सर्व मातांना व बालकांना मोफत सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.

तसेच ग्रामिण भागात बालविवाह रोखण्यासाठी शासन अधिसूचना दि. ०३ जून, २०१३ अन्वये ग्रामसेवक यांना त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून व संबंधीत ग्राम पंचायत क्षेत्रातील अंगणवाडी सेविका, या बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांस सहाय्य करतील अशी नियुक्ती केली आहे. तसेच नागरी भागासाठी शासन अधिसूचना दि.१८ ऑगस्ट, २०१६ अन्वये बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना आपापल्या संबंधित प्रकल्प क्षेत्रावर अधिकारीता असणारे बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे आणि बाल विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याला सहाय्य करण्याकरिता संबंधित बालविकास प्रकल्प (नागरी) या अंतर्गत नेमलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिकांची देखील नियुक्ती केली आहे. तसेच ग्रामस्तरावर ग्रामसभा आयोजित करुन जनजागृती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा (जि.बुलढाणा) तालुक्यात प्रियदर्शनी महिला बचत गटामार्फत करण्यात येत असलेला पोषण आहार अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत**

**(३) ५४६५६ (२४-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा (जि.बुलढाणा) तालुक्यात प्रियदर्शनी महिला बचत गटामार्फत करण्यात येत असलेला पोषण आहार अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिला हा आहार खात नसल्याची माहिती अंगणवाडी सेविकांनी संबधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त बचत गटांचा पत्ता हा चुकीचा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

परंतु गर्भवती महिलांना निकृष्ट पोषण आहार या बाबत दैनिक लोकमत बुलढाणा आवृत्ती या वृत्तपत्रामध्ये दि.२० मे २०१६ रोजी प्रसिध्द झालेली होती. सदर बातमीचे अनुषंगाने बाल विकास प्रकल्प अधिकारी बुलढाणा यांना चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करणेबाबत जिल्हा परिषद, बुलढाणा कार्यालयाने सुचित केले होते, त्याअनुषंगाने बाल विकास

प्रकल्प अधिकारी बुलढाणा यांनी चौकशी केली असून मे, २०१६ गर्भवती महिलांना पुरवठा करण्यात आलेला आहार हा निकृष्ट दर्जाचा नसून तपासणीत चांगल्या प्रतीचा आढळून आलेला असल्याचे सदर चौकशीत नमुद केले आहे.
(२), (३) व (४) बचत गटात जागा कमी पडत असल्यामुळे त्यांनी जवळच ५०० मी अंतरावर गायत्रीनगर, मच्छी ले-आऊट बुलढाणा येथे जागा घेतलेली आहे.

---

**खर्डी (जि.ठाणे) रुग्णालयातील असुविधांबाबत**

**(४) ५४७२४ (३०-०८-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील खर्डी रुग्णालयात सुविधांचा तुटवडा असल्यामुळे विजे अभावी शव विच्छेदन केंद्रातल्या कर्मचाऱ्यांना बॅटरीच्या उजेडात विच्छेदन करावे लागत असून रुग्णालयात पाणी नसल्याने प्रसूती साठी आलेल्या महिलांना शहापूर येते पाठविले जात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खर्डी रुग्णालयाची जागा माहे, ऑक्टोंबर,२०१५ मध्ये ठाणे जिल्हा चिकित्सक यांच्या नावावर झाल्यांनतर रुग्णालयाच्या इमारतीच्या वास्तु मांडणी नकाशा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवास स्थानासाठी १२ कोटी ३९ लाखांचे अंदाज पत्रक मान्येतेसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पाच महिन्यापूर्वी पाठवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त अंदाजपत्रक व वास्तुमांडणी नकाशाबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे.
ग्रामीण रुग्णालय खर्डी येथील इमारत व कर्मचारी निवासस्थानाच्या बांधकामाचा वास्तुमांडणी नकाशा मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानंतर सदर बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**बुलढाणा जिल्हयातील पात्र असलेल्या मुलींना महिला बालकल्याण विभागाच्या वतीने वाटण्यात येणारा पोषण आहार मुदतबाहय असल्याबाबत**

**(५) ५४८०४ (२४-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील पात्र असलेल्या मुलींना महिला बालकल्याण विभागाच्या वतीने वाटण्यात येणारा पोषण आहार मुदतबाहय असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तक्रार मोताळा पंचायत समितीचे गटनेते यांनी जिल्हापरिषद प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) किशोरवयीन मुलींना (सबला) मुदत संपलेला पोषण आहार वाटप झाल्याबाबतची तक्रार श्री रामदास भगवान चौथनकर, पंचायत समिती सदस्य, ता. मोताळा, जि.बुलढाणा यांनी केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची चौकशी करणे करीता बाल विकास प्रकल्प अधिकारी नांदूरा यांची नियुक्ती करण्यात आली होती. बाल विकास प्रकल्प अधिकारी नांदूरा यांनी चौकशी अहवालामध्ये नमूद केले आहे की, विकास महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्यादीत खामगांव यांनी कांदा, लसूण, मसाला मालाचा पूरवठा करतांना ५५३ संच पुरवठा केला व त्यापैकी ६५ संच मुदतबाह्य असलेले माल पुरवठा केला असल्याचे अहवालात नमूद आहे.
(४) मुदतबाहय पुरविलेले ६५ संच बदलून देण्याबाबत पुरवठादारास कळविण्यात होते. त्यानुषंगाने संबंधित पुरवठेदार यांनी मुदतबाहय पुरवठा केलेल्या संचाऐवजी नविन पाकीटे लाभार्थ्यांना बदलून दिले आहेत.

---

### चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे ट्रामाकेअर युनिटच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत

**(६) ५५५१६ (०१-०९-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियोजन कालबध्द कार्यकमातंर्गत चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे ट्रामाकेअर युनिट मंजूर करण्यात यावे असा प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक चंद्रपूर हयांनी उपसंचालक सार्वजनिक आरोग्य विभाग नागपूर यांच्या मार्फतीने जाक्र/सारूचं/नियोजन/ट्राकेयु/प्रस्ताव मं सादर/८३७२/१६ दिंनाक १८/४/२०१६ च्या सुमारास सहसंचालक आरोग्य सेवा रूग्णालय (राज्यस्तर) संचालनालय मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आलेला असल्याची माहिती दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रम्हपूरी येथे ट्रामाकेअर युनिट मंजूर करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिंनाक २३ मे, २०१६ रोजी आणि त्यापुर्वी सुध्दा अनेकदा निवेदन दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ब्रम्हपूरी येथे ट्रामाकेअर युनिट मंजूर करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०८-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्यसंस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून सदरची मागणी निकषानुसार जोड बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील भिक्षेक-यांवर नियंत्रण आणण्यासाठी जुन्या कायद्यात सुधारणा करण्याबाबत**

**(७) ५८०८१ (२४-०८-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील भिक्षेक-यांचा प्रश्न गंभीर होत असून भिक्षेक-यांवर नियंत्रण आणण्याकरिता सध्या राज्यात सन १९५९ च्या भिक्षा प्रतिबंधक अधिनियमांतर्गत कारवाई करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिक्षेक-यांवर नियंत्रण आणण्यासाठी जुन्या कायद्यात सुधारणा करुन त्यातील अटी बदलण्यात याव्या यासाठी एक शासकीय समिती गठीत केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :**(१) होय.
(२), (३) व (४) भिक्षा प्रतिबंध अधिनियम १९५९ मध्ये सुधारणा करण्यासाठी प्रधान सचिव (म व बा वि) यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्र.भिक्षाप्र-२००९/प्र.क्र. १५२/का.-९ दिनांक २२.०२.२०१३ व शुध्दीपत्रक (२) दि. १९.०३.२०१४ अन्वये अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समितीने वेळोवेळी बैठका घेऊन मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम १९५९ मध्ये सुधारणा करणेकामी प्रारुप मसुदा तयार केला आहे. सदर मसुदा आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या कार्यालयाकडून दि. २६.०५.२०१७ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून, त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियांनातील गावठा येथे पाझर तलावाच्या दुरुस्तीचे काम**

**(८) ६४०८८ (२४-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियांनातील गावठा येथे पाझर तलावाच्या दुरुस्तीचे काम इमारती बांधकामाचा अनुभव हा पाझर तलाव बांधण्यासारखाच असतो असे सांगत जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाने एका ठेकेदाराला काम दिले असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या पाझर तलावाचे काम पुन्हा निविदा काढून योग्य ठेकेदाराला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०९-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) पहिल्या ठेकेदाराने पाझर तलाव दुरुस्तीचे काम करणे शक्य नसल्याने निविदा प्रक्रियेतून माघार घेतली. यासंदर्भात व्दितीय न्यूनतम ठेकेदार पहिल्या ठेकेदाराने घेतलेल्या दरातच कामे करण्यास तयार झाल्याने फेरनिविदा काढण्यात आली नाही. सद्यस्थितीत प्रस्तुत पाझर तलावाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठात निधीचा तुटवडा असल्याबाबत

**(९) ६५४४२ (१६-१२-२०१६). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठात निधीचा तुटवडा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विद्यापीठाचा कारभार सक्षमपणे चालविण्यासाठी आवश्यक असलेली किमान ६०० कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे विद्यापीठातील ६०० पैकी निम्मीच पदे अद्यापपर्यंत भरण्यात आली असून त्यातीलही सर्व पदांना शासन मान्यता देत नसल्यामुळे विद्यापीठाला स्वत:च्याच उत्पन्नातून वेतन द्यावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर विद्यापीठाची रिक्त पदे भरून शिक्षणाचा दर्जा वाढविण्याकरिता तसेच विद्यापीठ सुरळीतपणे चालविण्याकरिता निधीची तरतूद करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०९-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही.
(२) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विशेषतः महामुंबई स्थित मुत्रपिंडाशी निगडीत विकाराशी संधार्म्य असलेले वा रक्त संचय केंद्राचे परवाने रद्द करण्याबाबत**

**(१०) ६५७४७ (१०-०१-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः महामुंबई स्थित मुत्रपिंडाशी निगडीत विकाराशी संधार्म्य असलेल्या विकाराबाबत तथाकथित मूत्रपिंड तस्करांच्या टोळीस त्यांचे अवैद्य धंदे नेस्तनाबुत करण्याकरिता त्यांच्याकडे असलेले परवाने वा रक्त संचय केंद्राचे परवाने रद्द करण्याबाबत दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास संबंधित रक्त संक्रमण शिबीर प्रमुख, मुत्रपिंड शल्यचिकित्सक आणि राज्य आरोग्य सेवा संचालनालयाच्या पदाधिकाऱ्यांनी शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने संबंधित प्रकरणी संबंधित वैद्यकीय शिक्षण विभागाच्या आणि संबंधित आरोग्य विभागाच्या केंद्र चालकांनी तसेच सेवाभावी संघटनेच्या तसेच जनप्रतिनिधी व जागृत नागरिकांच्या संघटनेने सदर बाब निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर बाबतीत सखोल चौकशी अंती काय निष्पन्न झाले व त्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभाग, नगर विकास विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग व या विभागांच्या अधिनस्त राज्य रक्त संक्रमण परिषद, बृहन्मुंबई महानगरपालिका आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन यापैकी कोणत्याही कार्यालयास अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) हे ही खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैद्यकीय प्रवेशांसाठी सन २०१२ ते २०१५ या कालावधीत सादर केलेल्या बनावट जात प्रमाणपत्राबाबत**

**(११) ६६०१४ (१६-१२-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय प्रवेशांसाठी सन २०१२ ते २०१५ या कालावधीत बनावट जात प्रमाणपत्र सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्याच्या आदल्या दिवशीच दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी आरोपी असलेले ९ विद्यार्थी फरार झाल्याची घटना दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्रांवर नंदूरबार जिल्हा जात पडताळणी प्रमाणपत्र समितीचे खोटे सही शिक्के आढळून आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आणि विद्यार्थी पालकांना बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र देणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सदरहू गैरप्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०९-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) संबंधितांविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज दिनांक १ मे,२०१६ पासून आदि 'प्रमाण' प्रणालीद्वारे संपूर्णपणे ऑनलाईन करण्यात आलेले आहे.

तसेच, सन २०१७-१८ च्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या वेळी विद्यार्थी महाविद्यालयामध्ये सादर करीत असलेली जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या सत्यासत्येची पडताळणी महाविद्यालयामार्फत संबंधित समितीकडून करुन घेण्याबाबतचे निर्देश संचालनालयामार्फत जारी करुन समितीमार्फत प्रमाणपत्राची वैधता तपासणी करुन आल्यानंतर विद्यार्थ्यांचा प्रवेश अंतिम करण्यात येणार आहे. दरम्यानच्या कालावधीत 'प्रमाणपत्र अवैध ठरल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल याबाबत मला ज्ञात आहे' अशा आशयाचे हमीपत्र संबंधित विद्यार्थ्यांकडून प्राप्त करुन घेण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे नाव (ता.पाटण, जि.सातारा) गावातील मुलकीपड जमीन कायमस्वरूपी शेतकऱ्यांना कसण्यास मिळण्याबाबतची मागणी

**(१२) ६६१९८ (०९-०१-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नाव (ता.पाटण, जि.सातारा) गावातील डोंगरी व दुर्गम भागात वसलेल्या गावातील १०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांची मूलकीपड जमीन कायमस्वरूपी शेतकऱ्यांना कसण्यास मिळावी याबाबतची मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी सदर उपलब्ध मूलकीपड जमिनीपैकी गट न. ३, १३, १४, १५, १७, १८ या मधील जमिनी येथील ७२ शेतकऱ्यांना कसण्याकरिता देण्यात आल्या असून उर्वरित गट न. २१, २२, २३, २४ व २५ मधील जमिनी उर्वरित ३० शेतकऱ्यांना देणे बाकी असताना तत्कालीन ज़िल्हाधिकारी सातारा यांनी दिनांक २४ एप्रिल, १९८७ चे पत्रानुसार उर्वरित गटातील मूलकीपड जमीन वन विभागाकडे हस्तांतरित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वन विभागाकडे हस्तांतरित केलेली जमीन कसण्याकरिता मिळावी अशा आशयाचा प्रस्ताव ज़िल्हाधिकारी सातारा व राज्य शासनाच्या वन विभागाकडे दिनांक १ मार्च, २०१६ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०८-२०१७)** :(१) हे खरे नाही, अशा प्रकारच्या मागणी बाबतचे निवेदन आढळून येत नाही.

(२) मौजे नाव, ता. पाटण येथील गट क्र. २२, २३, २४ व २५ मधील एकूण ४९.६४ हे. पर्यायी क्षेत्र वन विभागास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्तावासाठी जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडील आदेशान्वये पर्यायी वनीकरणासाठी वन विभागाकडे वर्ग केले आहे. पर्यायी वनीकरणाचे क्षेत्रास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदी लागू होतात.

तसेच गट नंबर २१ चे क्षेत्र २००.३९ हे. बॉम्बे कॅसल (अधिसूचना) क्रमांक १२/एफ दिनांक १ मार्च, १८७९ अन्वये राखीव वन म्हणून घोषित झालेले आहे. सदरचे क्षेत्र हे सद्यस्थितीत सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये समाविष्ठ झाले आहे.

सर्व्हे नं. २२, २३, २४ व २५ मधील महसूल विभागाच्या ताब्यात असलेले महसूल पड क्षेत्र विविध १४ प्रकल्पांतर्गत पर्यायी क्षेत्र म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांनी सन १९८७ - ८८ मध्ये वन विभागाकडे वर्ग केले होते. त्यानुसार सदर क्षेत्राच्या कब्जेपट्टी देखील करण्यात आलेल्या होत्या. तथापि मौजे नाव सर्व्हे नं. २२, २३ व २५ मध्ये लोकांची अतिक्रमणे असल्याने जिल्हाधिकारी, सातारा यांनी सन १९८७ - ८८ मधील त्यांच्या आदेशामध्ये सुधारणा करुन मौजे नाव ऐवजी मौजे कोळणे, पाचगणी व कास येथील महसूल पड जमिनी वन विभागाकडे वर्ग केलेल्या आहेत. त्यामुळे मौजे नाव सर्व्हे नं. २२, २३ व २५ मधील वर्ग केलेल्या पर्यायी क्षेत्राची कलम ४ खाली अधिसूचना काढण्यात आलेली नाही. मात्र मौजे नाव सर्व्हे नं. २४ मधील ६.४२ हे. क्षेत्र हे शिरगाव-घाटमाथा-चौवणेश्वर रस्त्यासाठी वर्ग केल्याने या क्षेत्राची कलम २० खालील अधिसूचना दिनांक ३१.८.२०१५ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

(३) मौजे नाव, ता.पाटण येथील वन विभागाकडे हस्तांतरीत केलेली जमीन कसण्यासाठी मिळावी, अशा आशयाचे मा.श्री.शंभुराज देसाई, स्थानीक आमदार यांचे पत्र प्राप्त झाले होते, परंतु वनहक्क कायदयांतर्गत क्षेत्र देण्यात आलेले नाही.

(४) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्तावाच्या बदल्यात पर्यायी वनीकरणाकरिता प्राप्त झालेले उपरोक्त क्षेत्र सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या विस्तारीत क्षेत्रामध्ये समाविष्ठ झाले असून सध्या वन्यजीव विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील गोवंडी येथील शिवाजीनगर भागातील अंगणवाडीतील ५० मुलांमागे १३ मुले कुपोषित असल्याबाबत

**(१३) ६८४४२ (२७-०१-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोवंडी येथील शिवाजीनगर भागात प्रत्येक अंगणवाडीतील ५० मुलांमागे १३ मुले कुपोषित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील १७०० मुले कुपोषित असून यातील ४०० हून अधिक मुले तीव्र कुपोषित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या कुपोषित बालकांवर उपचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) व (२) होय.

तथापि, शिवाजी नगर (मुंबई), नागरी प्रकल्पांतर्गत माहे सप्टेंबर-२०१५ व सप्टेंबर-२०१६ या कालावधीतील खालीलप्रमाणे कुपोषणाबाबतची श्रेणीनिहाय आकडेवारी पाहता सप्टेंबर-२०१५ च्या तुलनेत माहे सप्टेंबर-२०१६ मध्ये तिव्र कमी वजनाच्या बालकांच्या टक्केवारीत घट झालेली आहे.

(३) योजने अंतर्गत सर्वसाधारण श्रेणीतील बालकांना दररोज (५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने असलेला) आहार देण्यात येतो. त्याच प्रमाणे तीव्र कमी वजनाच्या बालकांना दररोज (८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने असलेला) आहार देण्यात येतो. याप्रमाणे अंगणवाडीतील लाभार्थ्यांना पोषण आहारातुन आवश्यक ते प्रथिने व कॅलरीज देण्यात येत आहेत.

मध्यम कमी वजनाची व तीव्र कमी वजनाच्या बालकांना वैद्यकीय उपचारासाठी लोकमान्य टिळक हॉस्पीटल सायन मुंबई येथे संदर्भ सेवेद्वारे पाठविण्यात येते, अशा कुपोषित मुलांची नियमित आरोग्य तपासणी लसीकरण महानगरपालिका एम वॉर्ड अंतर्गत असलेल्या आरोग्य केंद्राद्वारे करण्यात येत आहे.

शिवाजीनगर प्रकल्पात बालकांचे कुपोषण निर्मुलनाकरीता एकुण १० स्वयंसेवी संस्था कार्यरत असून बाल विकास प्रकल्प, शिवाजीनगर यांच्या समन्वयाने प्रकल्प क्षेत्रात कुपोषण

निर्मुलनाकरीता पालकसभा, माता बैठक, पोषण आहार सप्ताह, आरोग्य शिबीर , प्रत्येक महिन्यात अंगणवाडी व अशासकीय संस्था एकत्रित बालकांचे वजन घेणे इकार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

सदर प्रकल्प हा जागतिक बँक सहाय्यित प्रकल्पांतर्गत येत असून या कार्यक्रमांतर्गत सामूदायावर आधारित कार्यक्रम (Community Based Event) अन्नप्राशन, ओटीभरण, बालभोजन इत्यादी कार्यक्रम अंगणवाडी स्तरावर राबविण्यात येत आहेत. तसेच वर्धित शिक्षणांतर्गत कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कुपोषणाच्या प्रश्नावर आरोग्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय टास्क फोर्स समिती स्थापन करण्याबाबत

**(१४) ७१४६६ (२७-०१-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुपोषणाच्या प्रश्नावर आरोग्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय टास्क फोर्स समिती स्थापन करण्याची घोषणा माहे सप्टेंबर, २०१६ च्या अखेरच्या आठवड्यात मा. मुख्यमंत्र्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त टास्क फोर्स समितीच्या आजपावेतो किती बैठका घेण्यात आल्या व त्यामध्ये कोणते निर्णय घेण्यात आले.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) पालघर जिल्हयातील विशेषत: जव्हार, मोखाडा आणि विक्रमगड तालुक्यातील सध्याच्या कालावधीत व मागील काही कालावधीत वाढ झालेल्या कुपोषणांच्या प्रकरणांवर कारणांचा आढावा घेण्यासाठी तसेच सदर प्रकरणांवर विशेष लक्ष देण्यासाठी संबंधित विभागांचे मा. मंत्री तसेच संबंधित प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचा समावेश असलेल्या कृती दलाची (टास्क फोर्सची) स्थापना करण्याबाबतचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आहेत. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०१६/प्र.क्र.३२१/का-५, दि. २१.१०.२०१६ अन्वये कृती दलाची (टास्क फोर्सची) स्थापना करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर समितीचे सदस्य सचिव हे प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग आहेत.

(२) सदर समितीच्या आजपावेतो ३ बैठका घेण्यात आलेल्या आहेत. राज्यातील कुपोषण निर्मुलनासाठी विविध निर्णय घेण्यात आलेले आहेत व त्यानुषंगाने सर्व संबंधीत यंत्रणांना निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हा परीषदेच्या बालकल्याण विभागातील गैरकारभाराबाबत**

**(१५) ७२६०१ (१०-०१-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हापरीषद येथील बालकल्याण विभागातील अमृत आहार योजनेत गैरप्रकार झाल्याचे दिनांक २६ जुलै, २०१२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमृत योजनेची बिले समितीच्या खात्यात जमा न करता व गरोदर मातांचे आहाराचे वाटप न करता बोगस बिले काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेत झालेल्या गैरप्रकार आर्थिक अनियमेतेबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

अमृत आहार योजना दिनांक ०१ डिसेंबर, २०१५ पासून लागु करण्यात आली आहे. तसेच सदर योजनेत गैरप्रकार झाल्याचे आढळुन आले नाही.

(२) हे खरे नाही.

अमृत आहार योजनेचा निधी स्थानिक आहार समितीच्या खात्यात जमा करण्यात येतो. नोंदणी झालेल्या गरोदर माता व स्तनदा मातांना आहार देण्यात येतो. त्याबाबतची सर्व लाभार्थींच्या नावासहित अभीलेखे जतन करण्यात आले आहेत. त्यामुळे बोगस बिले काढण्यात आलेली नाही.

(३) लागु नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेल्या २९७ कोटींच्या औषध खरेदीच्या अहवालाबाबत**

**(१६) ७३९७७ (१८-०४-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०१४-२०१५ वा त्यासुमारास खरेदी केलेल्या २९७ कोटींच्या औषध खरेदीबाबत शासनाने एक सदस्यीय चौकशी समिती नेमली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, या अहवालात कोणकोणते निष्कर्ष काढण्यात आले आहेत आणि त्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०९-२०१७)** :(१) हे खरे आहे.

डॉ.भगवान सहाय, अपर मुख्य सचिव यांच्या एकसदस्यीय समितीच्या प्राथमिक चौकशी अहवालातील शिफारशीनुसार सखोल चौकशीसाठी श्री.गौतम चॅटर्जी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव यांची एकसदस्यीय समिती नेमण्यात आली होती.

(२) होय.

(३) श्री.गौतम चॅटर्जी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव यांच्या एकसदस्यीय समितीने सादर केलेल्या सखोल चौकशी अहवालामध्ये "आरोग्य सेवा संचालनालयामार्फत करण्यात आलेल्या खरेदीमध्ये खरेदी आणि पुरवठा करताना कोणतीही अनियमितता किंवा प्रचलित पध्दतीचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले नाही तसेच राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत करण्यात आलेल्या खरेदीत निष्काळजीपणा व समन्वयाचा अभाव दिसून आला आहे", असे निष्कर्ष नोंदविलेले आहेत. सदर चौकशी अहवाल शासनाने स्वीकारला आहे.

सदर निष्कर्षानुसार एका अधिका-याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महिला व बालविकास आयुक्त पुणे यांनी नियमबाहय नियुक्त्या केल्याबाबत

**(१७) ७४००३ (१९-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास आयुक्त पुणे, येथे सन २००४-२०१६ या कालावधीत कनिष्ठ लिपिक ते परिविक्षा अधिकारी, परिविक्षा अधिकारी ते जिल्हा परिविक्षा अधिकारी, या पदावर नियुक्ती करताना तसेच पदोन्नत्या देताना, नियमानुसार सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय, पुणे यांच्याकडून बिंदुनामावलीची तपासणी न करताच तसेच मान्यता न घेताच, मागासवर्गीयांच्या आरक्षणानुसार भरती न करता त्यांच्यावर अन्याय करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी उच्च स्तरीय चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या महिला व बालविकास आयुक्त पुणे यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७)** :(१) कनिष्ठ लिपिक या संवर्गातुन थेट परिविक्षा अधिकारी या संवर्गात पदोन्नती देण्याबाबत सेवाप्रवेश नियमात तरतूद नाही.

i) सन २००४ ते २०१३ या कालावधीत आयुक्तालयांतर्गत कायरत संवर्गाची बिंदुनामावली नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तथापि सहायक आयुक्त, (मागासवर्ग कक्ष) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडुन मान्यता घेण्यात आलेल्या परिविक्षा अधिकारी/वरिष्ठ लिपीक/ कनिष्ठ लिपिक/निदेशक/शिक्षक/डाटा इन्ट्रीऑपरेटर/कृषी सहायक/निम्नश्रेणी लघुलेखक/कनिष्ठ काळजी वाहक/स्वंयपाकी/वार्डबॉय-पहारेकरी या संवर्गाच्या बिंदुनामावली नोंदवहीस कोणतेही आक्षेप दर्शविण्यात आलेले नाहीत.

ii) कनिष्ठ लिपिक, निम्नश्रेणी लघुलेखक, कृषीसहायक/निदेशक/शिक्षक कनिष्ठ काळजी वाह/स्वयंपाकी/वार्डबॉय/पहारेकरी/परिचर या संवर्गाचे आपेक्ष दर्शविणेत आलेले आहेत. आक्षेपासंदर्भात आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्याकडुन अहवाल सादर करून आक्षेपाची पूर्तता करण्यात येत आहे.

iii) सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन तपासणी करण्यात आलेल्या सन २००४ ते २०१६ या कालावधीतील परिविक्षा अधिकारी आणि जिल्हा परिविक्षा अधिकारी या संवर्गाचे बिंदुनामावलीबाबत कोणताही प्रतिकुल अभिप्राय / शेरे नमुद करण्यात आलेले नाही.

iv) पदोन्नती संदर्भातील कार्यवाहीचे अनुषंगाने बिंदुनामावली बाबत कोणत्याही मागासवर्गीय कर्मचाऱ्याने त्याचेवर अन्याय झाल्याबाबतची आयुक्तालयास तक्रार केलेली नाही. तसेच मागासवर्गीय कर्मचाऱ्यावर अन्याय झाल्याबाबत सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांचे कार्यालयाकडेही कोणतेही तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे सहायक आयुक्त (मागसवर्ग कक्ष) यांचे कार्यालयाकडुन सादर अहवालात नमुद करण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील अंगणवाडी बांधकामासाठी प्राप्त झालेला निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(१८) ७४५६६ (१८-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील अंगणवाडयांच्या बांधकामासाठी जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला रु. १२ कोटींचा निधी अखर्चित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयामध्ये अनेक ठिकाणी अंगणवाडया उघडयावर भरविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निधी अखर्चित ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) नाशिक जिल्हयात ९५३ ठिकाणी अंगणवाडी इमारती नाहीत मात्र सद्यस्थितीत पर्यायी व्यवस्थेमार्फत ८०९ ठिकाणी अंगणवाडी केंद्र भरविली जातात व १४४ ठिकाणी सदरच्या अंगणवाडया वस्ती / पाडा वर असल्याने तेथे जागा व अन्य इमारत उपलब्ध नसल्याने ओटयावर किंवा मंदिरात भरविण्यात येतात. परंतु नाशिक जिल्हयामध्ये उघडयावर एकही अंगणवाडी भरत नाही.

(३) व (४) सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात आदिवासी व बिगर आदिवासी उपयोजनांतर्गत एकूण ४३१ अंगणवाडी बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ११७

कामे पुर्ण झाली असून २७७ कामे प्रगतीत आहेत. तसेच ३७ कामांना वेळोवेळी प्रसिध्दी दिल्यानंतरही प्रतिसाद न मिळणे, जागा उपलब्ध नसणे, आदिवासी क्षेत्रातील अतिदुर्गम भागातील कामे असल्याने बांधकाम साहित्या जागेपर्यंत पोहचविणे शक्य नसल्याने निविदा प्रक्रियेस प्रतिसाद नाही, त्यामुळे कामे होऊ शकली नाहीत. त्याचप्रमाणे नाशिक जिल्हयातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कडून ठेकेदारांचे झालेल्या कामांचे धनादेश न वटल्याने ठेकेदारांनी काम आहे त्या स्थितीत आहेत. वरीलप्रमाणे प्रशासकीय व तांत्रिक अडचणीमुळे कामे अपुर्ण असल्याने निधी अखर्चित राहिल्याचे दिसून येत आहे.

---

**महिला व बाल कल्याण विभागाच्या पोषण आहार योजनेच्या निधीमध्ये ६२ टक्क्यांनी कपात केल्याबाबत**

**(१९) ७५०५२ (१५-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुपोषित मुलांचे प्रमाण सातत्याने वाढत असताना सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पामध्ये महिला व बाल कल्याण विभागाच्या पोषण आहार योजनेच्या निधीमध्ये ६२ टक्क्यांनी कपात केल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक संस्था व संघटनांनी या संदर्भात निदर्शने केल्यानंतर सदर योजनेच्या निधीमध्ये ३२ टक्क्यांनी वाढ करण्यात आली असली तरी उर्वरित निधीमध्ये ३० टक्के इतकी कपात कायम आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदरची योजना राबवत असताना विभागामध्ये अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरची योजना राज्यामध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करणे व विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे,

(५) असल्यास, सन २०१७-१८ अर्थसंकल्पामध्ये सदर योजनेसाठी किती निधी उपलब्ध करून देणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

महिला व बाल विकास विभागाच्या पोषण आहार या योजनेस सन २०१५-२०१६ मध्ये पुरवणी मागणीसह प्राप्त झालेला निधी व सन २०१६-१७ मध्ये प्राप्त झालेली मूळ अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेता निधीमध्ये कपात दिसत असली तरी सन २०१६-१७ मध्ये पुरवणी मागण्यांद्वारे प्राप्त झालेल्या निधीसह विभागास पुरेसा निधी प्राप्त झाला आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील रिक्त पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

बाल विकास प्रकल्प अधिकारी वर्ग-२ च्या १४७ पदांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच मुख्यसेविका वर्ग-३ (शहरी प्रकल्प) या पदाबाबत विविध न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. तर सेविका व मदतनीस यांची पदे तात्काळ भरणेबाबत सर्व संबंधित अधिका-यांना आयुक्तालय स्तरावरून सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सदर योजनेसाठी केंद्र व राज्य हिश्श्याची मिळून रु.५९६.८६ कोटी रुपये इतकी रक्कम अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या निधीतून राज्यात ग्राम बालविकास केंद्र योजना पुन्हा सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२०) ७५३५३ (१८-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), अ‍ॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या निधीतून राज्यात ग्राम बालविकास केंद्र योजनेस राज्याच्या आरोग्य विभागास मिळणारा निधी बंद झाल्याने सदर केंद्रे बंद झाल्यामुळे शासनाने महिला व बालविकास विभागाच्या दिनांक २५ ऑक्टोंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील आदिवासी क्षेत्रात ग्राम बालविकास केंद्र योजना पुन्हा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने आतापर्यंत काय निर्णय घेतला आहे व सदर योजनेसाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) होय.

(२) राज्यात आदिवासी क्षेत्रात अति तीव्र कुपोषित बालकांसाठी (SAM) ग्राम बाल विकास केंद्र (व्ही.सी.डी.सी.) योजना सुरु करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट,२०१७ रोजी निर्गमीत करण्यात आला आहे. प्रस्तुत योजना राबविण्याकरीता रु.१८.७९ कोटी इतका निधी मंजूर करण्यात येवून जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात आला आहे. तसेच बिगर आदिवासी क्षेत्रात ग्राम बाल विकास केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथील सिव्हील हॉस्पीटलमधील दुरवस्था**

**(२१) ७५३७३ (१९-०४-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील सिव्हील हॉस्पीटलमध्ये एम.आर.आय मशीन, सीटी स्कॅन व एक्स रे मशीन उपलब्ध नाहीत तसेच अधीक्षक, स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर, मशीन ऑपरेटर व पॅथॉलाजिस्ट नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागात ७० टक्के नागरिक दारिद्रयरेषेखाली आहेत गोरगरीब रुग्णाकडून ७००० रुपये घेतले जातात या कारणास्तव उक्त रुग्णालयातील दोन कर्मचाऱ्यांवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्ण व त्याच्या नातेवाईकांची होणारी गैरसोई दूर करुन आवश्यक मशीन उपलब्ध करुन देण्यासाठी व तज्ञ डॉक्टर व इतर कर्मचा-यांची पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०९-२०१७) :**(१) मालेगांव, जि.नाशिक येथील सामान्य रुग्णालयामध्ये क्ष-किरण मशीन कार्यान्वित आहे. सदर रुग्णालयाकरीता सी.टी. स्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. वैद्यकीय उपकरणांच्या प्रचलित निकषांनूसार सदर रुग्णालयामध्ये एम.आर.आय. मशीनची सुविधा उपलब्ध नाही.

सामान्य रुग्णालय, मालेगाव येथील वैद्यकीय अधिक्षकाच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिका-याकडे सोपविण्यात आलेला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकूण मंजूर ४४ पदांपैकी २७ पदे भरलेली आहेत.

पॅथॉलॉजिस्ट नियमित स्वरुपात उपलब्ध असून स्त्रीरोग तज्ञाच्या सेवा ऑन कॉल बेसीसवर उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

गट-क संवर्गातील विविध मशीन तंत्रज्ञांची पदे भरलेली आहेत.

(२) सामान्य रुग्णालय, मालेगाव येथे दाखल होणाऱ्या रुग्णांकडून विहित रुग्णालयीन शुल्काव्यतिरिक्त अन्य कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही.

दोषी कर्मचा-याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास दिनांक २४.०८.२०१६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(३) गट-अ संवर्गातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त पदे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निवड समितीमार्फत जिल्हास्तरावरुन भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या असून सदर पदांच्या लेखी परिक्षा घेण्यात आलेल्या आहेत.

सामान्य रुग्णालय, मालेगांव करीता सीटी स्कॅन मशीन खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीमधील एका कारखान्यात अंगणवाडी पोषक आहाराच्या पाकिटावरील तारखा बदलल्या जात असल्याबाबत**

**(२२) ७५८४२ (१९-०४-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि. पालघर) येथील औद्योगिक वसाहतीमधील एका कारखान्यात अंगणवाडी पोषक आहाराच्या पाकिटावरील तारखा बदलल्या जात असल्याचा तसेच मुदतबाहय आणि विना तारखेची हजारो खाद्यपाकिटे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिसांना आढळून आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांवर कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७)** :(१) वसई जि.पालघर येथे शलाका महिला मंडळ यांचे THR उत्पादन केंद्र असून बाल विकास प्रकल्प अधिकारी मिरा भाईंदर या शहरी प्रकल्पाकरीता कार्यान्वित असल्याने बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचा दिनांक १८.१.२०१७ अन्वये सदर घटनेच्यावेळी (दि.१०.१.२०१७ रोजी) वाळीव पोलीस स्टेशन मध्ये भेट देऊन THR पुरवठा आपल्या कार्यालयाच्या आदेशानुसार होत आहे काय असे विचारणा करण्यात आली होती व काही पाकीटांवर बॅच नंबर वर तारीख टाकताना कर्मचारी खाडाखोड करीत असल्याचे महानगरपालिका कर्मचा-याने पोलीस स्टेशनमध्ये सांगितले आहे. परंतु प्रत्यक्षात पोलिस स्टेशनमध्ये गुन्हयाची नोंद करण्यात आलेली नाही. बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी उत्पादन केंद्राला भेट दिली असता सोबत अन्न व औषध प्रशासन विभागांचे अधिकारी होते. सदर पाकीटे वेगवेगळी ठेऊन वापर न करणेची सूचना देण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासन अधिका-याने सदर पाकीटे तपासणी करणेसाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले होते. तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी जानेवारी २०१७ या पुरवठा करणेत आलेल्या

मालाचे प्रत्यक्ष अंगणवाडीतून नमुने प्रयोग शाळेत पाठविण्यात आले होते. बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी पाठविलेल्या व अन्न व औषध प्रशासन अधिकारी यांनी पाठविलेल्या नमुन्याचा अहवाल प्राप्त झाला असून पोषण आहार खाण्यास योग्य असल्याचे आढळून येते. तथापि, तपासणी अहवालावरती बॅच नंबर व लॉट नंबर नसल्याचे दिसून आले आहे. मात्र सद्यस्थितीत सदर महिला मंडळ यांचा THR वाटपाचा ठेका रदद केलेला आहे व रु.१,५०,०००/- दंडही ठोठावण्यात आला असून सदरचा दंड मंडळाने भरलेला आहे.

(२) यामध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाने पाठविण्यात आलेल्या नमुन्याचा अहवालामध्ये शलाका मंडळ यांचे २ नमुने निर्देशाकाप्रमाणे योग्य असल्याचे दिसून येत असून यासोबत अहवाल क्र.१०७/२०१७ हा कामादेवी महिला बचतगट, बदलापूर व क्र.१०८/२०१७ हा अहवाल सदगुरु स्वयंसहाय्यता महिला बचत गट, राजापूर, जि.रत्नागिरी यांचा दिसून आला असून संबंधित अन्न व औषध प्रशासन निरिक्षक यांना विचारणा केली असता सदर उत्पादन केंद्रावर जप्त केलेल्या मालापैकी ८५५ किला ग्रॅम कामादेवी महिला बचत गटाचा माल आढळून आलेला आहे व ७२२ कि.ग्रॅ. सदगुरु स्वयंसहाय्यता महिला बचत गट, राजापूर यांचा माल आढळून आलेला आहे. याबाबत कामादेवी महिला बचत गट यांचा खुलासा मागविण्यात आलेला होता. सदर खुलास्यामध्ये सदर पाकीटांशी कामादेवी बचत गटाचा काहीही संबंध नसल्याचे कळविलेले आहे.

(३) सदर उत्पादन केंद्र असलेल्या शलाका मंडळाचा ठेका रदद करण्यात आला आहे व रु.१,५०,०००/- दंडही ठोठावणेत आला असून सदरचा दंड मंडळाने भरलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वेल्हे, मुळशी व भोर (जि.पुणे) तालुक्यातील अंगणवाडयांना स्वत:ची इमारती नसल्याबाबत**

**(२३) ७५८६८ (१५-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील वेल्हे तालुक्यात १०८ पैंकी २०, मुळशी तालुक्यात १८३ पैकी ११६ व भोर तालुक्यात २५३ पैकी १२२ अंगणवाडयांना स्वत:ची इमारत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारत नसलेल्या अंगणवाडयांना जागा उपलब्ध करुन देवून त्यांना स्वत:ची इमारत बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) वेल्हे, मुळशी व भोर तालुक्यामध्ये एकही अंगणवाडी केंद्र उघडयावर भरत नाही. जागा उपलब्धतेप्रमाणे अंगणवाडी इमारत बांधकाम मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच यासंदर्भात जागा उपलब्ध नसणाऱ्या अंगणवाडी केंद्रासाठी जागा उपलब्ध करणेबाबत पुणे जिल्हयातील

सर्व गट विकास अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्री क्षेत्र कौंडण्यपूर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करण्याबाबत**

**(२४) ७७२०८ (१८-०४-२०१७). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र कौंडण्यपूर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री यांना दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी येणाऱ्या भाविकांना व नागरिकांना आरोग्यसेवा मिळावी यासाठी शासनाने निर्णय घेवून प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०८-२०१७) :**(१) हे अंशतः खरे आहे.
सन २०१५ मध्ये लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे .
(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून सदरचे ठिकाण बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पूर्णानगर (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करण्यास मान्यता व निधी मिळण्याबाबत**

**(२५) ७७२२२ (१८-०४-२०१७). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णानगर (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करण्यास मान्यता व निधी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण यांना निवेदन देऊन अद्याप कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेवून येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून सदरचे ठिकाण बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी जिल्हातील अंगणवाडयांना शासनाकडून थेट अनुदान देण्याबाबत**

**(२६) ७७७९४ (१८-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी जिल्हातील अंगणवाडयांना शासनाकडून थेट अनुदान वितरीत करण्यात येणार असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेची अमंलबजावणी तातडीने करण्याच्या अनुषगांने शासनस्तावर कोणत्या उपययोजना सुरू आहेत,
(३) असल्यास, उक्त उपाययोजनांची सद्दस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आहार योजने अंतर्गत आदिवासी क्षेत्रातील अनुसुचित क्षेत्रात अंगणवाडी केंद्रामार्फत गरोदर व स्तनदा मातांना एकवेळ पूर्ण जेवण देण्यात येते. तसेच ३-६ वर्षे वयोगटातील बालकांना प्रतिदिन रु.५/- किंमतीत आठवडयातुन चार दिवस केळी/अंडी देण्यात येतात. प्रत्येक अंगणवाडी केंद्रात आहार समिती गठीत करुन त्यांचे नावे बँकेत खाते उघडण्यात येऊन त्या खात्यात सदरबाबत आवश्यक असलेली तरतुद जमा करण्यात येते. या खात्यात थेट रक्कम जमा करता यावी यासाठी Software बनविण्यात आले आहे.
(३) आहार समितीचे बँक खात्याची पडताळणी करण्यात येत आहे, त्यानंतर प्रत्येक खात्यात अल्पशी तरतुद जमा करुन खात्यांची चाचणी घेण्यात येणार आहे. खात्याची संख्या मोठया प्रमाणावर असुन आहार समितीची खाते उघडणे, पडताळणी करणे, चाचणी घेणे इ. कामे असल्यामुळे वेळ लागत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात एकात्मिक बालविकास या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत**

**(२७) ७८२०२ (१५-०४-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बालविकास या केंद्र पुरस्कृत योजनेतील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या वयोमर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विचाराधीन बाबीं संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०९-२०१७) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(२८) ७८५८८ (१८-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी एक दिवसीय धरणे-आंदोलन माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान आझाद मैदान, मुंबई येथे केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषांप्रमाणे राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर याबाबत कार्यवाही करण्यात येईल. सेविकांना देण्यात येणाऱ्या राज्य मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवली (ता.मालवण) येथील १३०० कांदळवन वृक्षांची तोड झाल्याबाबत**

**(२९) ७८७१५ (१७-०४-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवली (ता.मालवण) येथील १३०० कांदळवन वृक्षांची तोड झाल्याबाबत ग्रामस्थांनी तक्रार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०८-२०१७) :**(१) व (२) होय हे खरे आहे.

मौजे देवली स.नं. २१९ व २२० या क्षेत्रात भेंडस ०१, तिवर ०३ व हूरा १३८० मिळून एकूण १३८४ या कांदळवन सदृश्य झाडांची विनापरवाना तोड केली असल्याचे दिनांक २७.०६.२०१७ रोजीच्या संयुक्त कांदळवन पहाणीमध्ये आढळून आले. सदर झाडांची तोड श्री. बळीराम आत्माराम देऊलकर, रा.देवली, ता.मालवण यांनी केलेली असल्याने त्यांच्यावर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ मधील तरतूदीनुसार मा. दिवाणी न्यायालय, मालवण यांचे न्यायालयात २९/२०१७ ने गुन्हा दाखल केलेला आहे .

(३) वन विभागाच्या अधिकार कक्षेनुसार या प्रकरणी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ अंतर्गत वृक्ष अधिकारी, कुडाळ यांनी संबंधितांवर दंडात्मक कारवाई केलेली असून, प्रकरणी दिनांक ९.२.२०१७ रोजी रु. १३८४०/- एवढा दंड वसूल केला असून जप्त जळावू जळताण माल खुला केलेला आहे.

(४) प्रकरणी वेळीच कारवाई केलेली असून प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

**दोडामार्ग व बांदा (जि.सिंधुदूर्ग) येथे माकडतापाचे रुग्ण आढळल्याबाबत**

**(३०) ७८९७९ (१८-०४-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील दोडामार्ग व बांदा येथे माकडतापाचे आठ रुग्ण माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात माकड तापाचा ०१ रुग्ण आढळून आला असून हा रुग्ण दोडामार्ग मधील तळकट येथील आहे. सदर रुग्ण उपचाराअंती पूर्ण बरा झालेला आहे.

(२) के.एफ.डी. (माकडताप) या आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत-

* दैनंदिन ताप रुग्ण सर्वेक्षण.
* किटक नियंत्रणासाठी आवश्यक प्रयत्न.
* तज्ञ पथकांची भेट व मार्गदर्शन.
    # राज्य शीघ्र प्रतिसाद पथकाची भेट.
    # शिमोगा (कर्नाटक) पथकाची भेट.
    # राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथील पथकाची भेट.
    # कर्नाटक, गोवा, केरळ या राज्यांच्या आंतरराज्य बेठकीचे आयोजन.
* राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथे रोग निदानाची मोफत व्यवस्था.
* स्थानिक पातळीवर उपचार सुविधा
* माकडताप टाळण्यासाठी जनतेस आरोग्य शिक्षण.
* बाधीत भागात मॅलेथिऑन पावडर डस्टींग
* जंगलात/शेतात काम करणाऱ्या व्यक्तींना शरीरावर लावणेकरीता डीएमपी ऑईल.
* गोवा मेडीकल कॉलेज येथे संदर्भसेवा कक्षाची स्थापना.
* बांदा सटमटवाडी येथे वैद्यकीय उपचार केंद्र सुरु.
* जोखीमग्रस्त लोकांना केएफडी प्रतिबंधकात्मक लसीकरण.
* पुरेश्या प्रमाणात औषधसाठा.
* जिल्हा ते राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी व मार्गदर्शन.
* मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांच्या भेटी मार्गदर्शनपर सुचना.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हयात कृषी विभागामार्फत स्थापलेल्या पाणलोट समितीने गावात बसविलेल्या सोलर लाईटची देखभाल करण्याबाबत

**(३१) ७९०९३ (१४-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात मागील काही वर्षापूर्वी कृषी विभागामार्फत स्थापन करण्यात आलेल्या पाणलोट समितीने गावात सोलर लाईट बसविले आहेत, परंतु सोलर लाईट देखभालीची जबाबदारी कोणी घ्यायाला तयार नसल्याने हे लाईट विनावापर पडून असल्याचे माहे जानेवारी २०१७ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने सोलर लाईट देखभालीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०८-२०१७) :**(१) होय. ४२ प्रकल्पांपैकी ५ प्रकल्पांना सोलार दिवे बसविण्यात आलेले नाहीत.

(२) सदर प्रकरणाची तपासणी करण्यात आली असून तपासणी अहवालानुसार दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करणेबाबत अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे कार्यालयाने, विभागीय कृषि सह संचालक, अमरावती यांना सूचना दिल्या आहेत.

(३) दर करारानुसार दुरुस्ती देखभाल करण्याच्या सूचना प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा तथा मंडळ कृषि अधिकारी यांनी दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे देवरी (जि.गोंदिया) येथील खसरा क्र. ५२९ हे आर वन जमिनीवर उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिलेले आदेश रद्द करण्याबाबत**

**(३२) ७९१०२ (१५-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवरी (जि.गोंदिया) येथील खसरा क्र. ५२९ हे. आर. जमीन जुना गट क्र. ६८,६९,७०/१ व ७१/१ त्याच जमिनीचा नवीन भू. क्र.२८६,२८७,२९१ ही जमीन वन विभागाच्या राखीव वन कास्त जमिनीला उपविभागीय अधिकारी देवरी यांचे दिनांक २० जुलै, २०१६ चे आदेश त्वरित रद्द करून गर्व-१ ची भोगवटदाराला मंजूरी दिली असल्याने त्याची चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत मागणी लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूर केलेल्या ५२९ ची पूर्ण जमिनीचे रिझर्व फॉरेस्टची नोटीफाईड असल्याने शासनाच्या परवानगीशिवाय आदेश देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०८-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.

मौजे देवरी, (जि.गोंदिया) येथील खसरा क्र. ५२९ हे. आर. जमीन जुना गट क्र. ६८, ६९, ७०/१ व ७१/१ त्याच जमिनीचा नवीन भू. क्र. २८६, २८७, २९१ रिझर्व फॉरेस्ट ची नोटीफाईड काबील कास्त जमीन भोगवटादार वर्ग-१ चा आदेश रद्द करण्याबाबत चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या दिनांक २९.८.२०१६ रोजीच्या निवेदनाद्वारे केली आहे.

त्यानुषंगाने तत्कालीन उपविभागीय अधिकारी, देवरी यांनी पारित केलेल्या एकूण ७ आदेशांपैकी ४ आदेश दिनांक १.३.२०१७ रोजीच्या आदेशान्वये व उर्वरित ३ आदेश दिनांक २०.४.२०१७ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आलेले आहेत.

(२) मा.लोकप्रतिनिधींच्या उपरोक्त निवेदनातील तक्रारीच्या अनुषंगाने प्रकरणी आवश्यक ती चौकशी करुन शासनाने दिनांक १२.५.२०१७ रोजीच्या ज्ञापनान्वये तत्कालीन उपविभागीय आयुक्त, देवरी यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी सूरु केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहूल तालुक्यात कुष्ठरोग शोध मोहिमेअंतर्गत संसर्ग झालेल्या रुग्णांच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(३३) ७९१६० (१५-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर, सटाणा, कळवण व देवळा या आदिवासीबहूल तालुक्यांमध्ये घरोघरी जावून कुष्ठरोग शोध मोहिमेअंतर्गत संसर्ग झालेल्या रुग्णांच्या प्रमाणात वाढ झाल्याचे आढळून आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुष्ठरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०७-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) १) सन २०१६-१७ मध्ये दि.१९/०९/२०१६ ते दि.०४/१०/२०१६ या कालावधीत “कुष्ठरोग शोध मोहिम” घेण्यात आली. यामध्ये आशा, स्वयंसेवक, आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत घरोघरी जावून प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आले आहे.

२) ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा घेऊन “ स्पर्श” कुष्ठरोग जनजागृती अभियान दि.२६/०१/२०१७ व ३०/०१/२०१७ रोजी राबविण्यात आले. या ग्रामसभेमध्ये कुष्ठरोगाबाबत शास्त्रीय माहिती व शासकीय योजनाबाबतची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली.

३) राज्यामध्ये दि.०६/०२/२०१७ ते दि.२१/०२/२०१७ या कालावधीमध्ये “फोकस लेप्रसी कॅम्पेन” घेण्यात आले.

४) ग्रामीण भागात माहे मार्च २०१७ मध्ये “हार्ड टू रीच” कार्यक्रम राबविण्यात आला यामध्ये पावसाळयात संपर्क तुटणा-या दुर्गम भागातील गावात आरोग्य शिक्षणाद्वारे जनतेचे सक्षमीकरण करण्यात आले.

५) आशांमार्फत व शहरी भागात लिंकवर्कर, आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत सर्व्हेक्षण करण्यात येत असून निदान झालेल्या कुष्ठरुग्णांना वेळीच बहुविध औषधोपचार (MDT) देण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयात न्याय वैद्यकशास्त्र विषय शिकविण्यासाठी एम.एस.सी.फोरेन्सिक सायन्स ह्या विषयातील पदवीधारकांची नेमणूक करणेबाबत**

**(३४) ७९५१५ (१८-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयात न्याय वैद्यक शास्त्र हा विषय शिकविला जात असून या अंतर्गत विविध मार्गांनी तपासण्या करण्याचे सखोल ज्ञान दिले जाते शासनाने २००९ पासून राज्यात मुंबई,नागपूर व औरंगाबाद येथे फोरेन्सिक सायन्स संस्था सुरु केली असून त्यात न्याय वैद्यक शास्त्राचे सखोल ज्ञान दिले जाते म्हणून या पदवी धारकांना एम.बी.बी.एस. च्या अभ्यासक्रमासाठी प्राध्यापक म्हणून नेमणूक मिळावी ही मागणी शासनाकडे अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास तदनुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०७-२०१७) :**(१) अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२), (३) व (४) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार व सेवाप्रवेश नियमानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एम.बी.बी.एस. च्या अभ्यासक्रमासाठी प्राध्यापक पदावर एम.डी. न्यायवैद्यकशास्त्र ही पदव्युत्तर पदवी संपादन केलेल्या उमेदवारांच्या नेमणुका केल्या जातात. त्यामुळे एम.एस.सी. फॉरेन्सिक सायन्स या विषयातील पदवीधारकांची सदर पदावर नेमणूक करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगांव जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षण संकुल तयार करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३५) ७९९९७ (१९-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील वैद्यकीय दंत आयुर्वेद, होमिओपॅथी भौतिकोपचार व महाविद्यालयाची निर्मिती करून जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षण संकुल तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) जळगांव येथे शासकीय एकात्मिक वैद्यकीय शिक्षण संकुल सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ११.०५.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्यातील बहुतांश अंगणवाडी केंद्र भाड्याच्या इमारतीत असल्याबाबत**

**(३६) ८००४० (१५-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषदे अंतर्गत २५७७ अंगणवाडी केंद्र मंजूर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पैकी ७० टक्के अंगणवाडी केंद्र भाड्याच्या अथवा जिल्हा परिषदेच्या शाळेत भरविली जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील मुला-मुलींची होणारी गैरसोय टाळण्याच्या अनुषंगाने सदर अंगणवाडी केंद्रांना स्वतंत्र इमारत उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०९-२०१७) :**(१) होय.

बुलढाणा जिल्हयाअंतर्गत २५७७ अंगणवाडी केंद्र व १४१ मिनी अंगणवाडी केंद्र मंजूर आहेत.

(२) हे खरे नाही.

२५७७ अंगणवाडी केंद्र व १४१ मिनी अंगणवाडी केंद्र असे एकूण २७१८ अंगणवाडी केंद्र मंजूर असून त्यापैकी ११४७ अंगणवाडी केंद्र स्वत:च्या इमारतीमध्ये व उर्वरीत ५८ टक्के म्हणजे १५७१ अंगणवाडी केंद्र जिल्हा परिषदेच शाळेत व इतर ठिकाणी भरविली जात आहेत.

(३) एकूण मंजूर २७१८ अंगणवाडी केंद्रापैकी ११४७ अंगणवाडी केंद्रास स्वत:ची इमारत आहे व उर्वरीत अंगणवाडी केंद्रास इमारत उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हा परिषदेअंतर्गत बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेचा**
**निधी अखर्चित असल्याबाबत**

**(३७) ८००४९ (१५-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलींची संख्या कमी असलेल्या १० जिल्हयामध्ये बुलढाणा जिल्ह्याचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा सर्व जिल्ह्यांसाठी बेटी बचाओ बेटी पढाओ या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यासह इतर ९ जिल्हा परिषदेअंतर्गत सदर योजनेसाठी सन २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी प्राप्त असलेला सुमारे दोन कोटी रूपयांचा निधी अखर्चित असल्याची बाब माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही. हे खरे नाही.

बुलढाणा जिल्हयासह बीड, जळगांव, अहमदनगर, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद सांगली व जालना या ९ जिल्हा परिषदेअंतर्गत बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेसाठी प्रति जिल्हा परिषद रु.४०,१५,१००/- असे मिळून एकूण रु.४,०१,५१,०००/- एवढा निधी वितरीत करण्यात आला त्यापैकी रु.२,९३,१८,६९८/- एवढी रक्कम खर्च केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सर्व जिल्हयांनी सादर केलेले आहेत. उर्वरीत अखर्चित असलेला रु.८२,००,०००/- एवढा निधी सन २०१६-१७ मध्ये खर्च करण्यास केंद्र शासनाकडून मंजूरी मिळाल्यानुसार सदर अखर्चित निधी खर्च केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हयांकडून प्राप्त झाल्यानुसार केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे. अद्याप रु.२६,३२,३०२/- एवढी रक्कम खर्च करण्यास चालू वर्षी केंद्र शासनाकडून परवानगी मिळालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सीईटी परीक्षा पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या जागा रिक्त ठेवल्याबाबत

**(३८) ८०८५२ (१९-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी एकूण २ हजार ९६० जागा असून त्या विभागाच्या संकेतस्थळावर दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी जागा शिल्लक नसल्याची सुचना प्रकाशित करण्यात आली होती त्यात केवळ २ हजार ५१७ पात्र विद्यार्थ्यांची यादी जाहिर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र उर्वरित २८५ रिक्त जागांची माहिती वैद्यकीय शिक्षण विभागाकडून देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीईटी परिक्षा दिलेले पात्र विद्यार्थी उपलब्ध असताना जागा रिक्त ठेवण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या गुणवंत विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०९-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातील दोन लाख अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या थकीत वेतनाबाबत**

**(३९) ८०८५५ (१८-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातील बालकांच्या आरोग्याचा आधार असलेल्या दोन लाख अंगणवाडी सेविका व मदतनीसांची थकीत वेतन, भाऊबीजेचे एक हजार रुपयेही न दिल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी तीन दिवसात अंगणवाडी सेविकांना त्यांचे वेतन देण्याचे आदेश दिल्यानंतरही सहाशे बालमृत्यू झालेल्या पालघर सह ठाणे, रायगड, नाशिक, मुंबईत ऑक्टोबर महिन्याचे वेतन देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची थकीत एक हजार भाऊबीज भेट व नियमित महिन्याचा पगार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे भाऊबीज भेट अदा करणेकरीता आयुक्तालय स्तरावरुन माहे नोव्हेंबर-२०१६ मध्ये अधिनस्त सर्व जिल्हा परिषद व नागरी प्रकल्पांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच सद्य:स्थितीत राज्यातील सर्व नागरी प्रकल्पांचे केंद्र व राज्य मानधन माहे फेब्रुवारी-२०१७ पर्यंत अदा असून काही ग्रामीण प्रकल्पांचे माहे फेब्रुवारी-२०१७ चे केंद्र मानधन अनुदाना अभावी प्रलंबित आहे. तसेच नविन आर्थिक वर्ष सन २०१७-१८ करीता मानधनासाठी प्राप्त तरतूद वितरण करणेत आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुष्ठरोग निर्मूलनासाठी आखण्यात आलेल्या मोहिमेबाबत

**(४०) ८१४२१ (१८-०४-२०१७). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयामध्ये दि.१९ सप्टेंबर २०१६ ते दि.४ ऑक्टोबर २०१६ रोजी वा त्यासुमारास घरोघरी जाऊन कुष्ठरोग शोध मोहिम शासनामार्फत राबविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील किती घरांना भेटी देवून कुष्ठरोग शोध मोहिम पथकाने तपासणी केली आहे,

(३) असल्यास, तपासणीमध्ये एकूण किती कुष्ठरोग रूग्ण आढळून आले आहेत,

(४) असल्यास, आढळून आलेल्या कुष्ठरोग रूग्णांवर उपचार करण्यासाठी व कुष्ठरोग नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०७-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) कुष्ठरोग शोध मोहिम पथकाने एकूण ५,०५,२६० घरांना भेटी देऊन तपासणी केली.

(३) या शोध मोहिमेच्या तपासणीमध्ये ३२८ नवीन कुष्ठरुग्णांचे निदान करण्यात आले.

(४) १) सन २०१६-१७ मध्ये दि.१९/०९/२०१६ ते दि.०४/१०/२०१६ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहिम" घेण्यात आली. यामध्ये आशा, स्वयंसेवक, आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत घरोघरी जावून प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आले आहे.

२) ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा घेऊन "स्पर्श" कुष्ठरोग जनजागृती अभियान दि.२६/०१/२०१७ व ३०/०१/२०१७ रोजी राबविण्यात आले. या ग्रामसभेमध्ये कुष्ठरोगाबाबत शास्त्रीय माहिती व शासकीय योजनाबाबतची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली.

३) राज्यामध्ये दि.०६/०२/२०१७ ते दि.२१/०२/२०१७ या कालावधीमध्ये "फोकस लेप्रसी कॅम्पेन" घेण्यात आले.

४) ग्रामीण भागात माहे मार्च २०१७ मध्ये "हार्ड टू रीच" कार्यक्रम राबविण्यात आला यामध्ये पावसाळयात संपर्क तुटणा-या दुर्गम भागातील गावात आरोग्य शिक्षणाद्वारे जनतेचे सक्षमीकरण करण्यात आले.

५) आशांमार्फत व शहरी भागात लिंकवर्कर, आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत सर्व्हेक्षण करण्यात येत असून निदान झालेल्या कुष्ठरुग्णांना वेळीच बहुविध औषधोपचार (MDT) देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रुग्णालयात**
**एक्सरे मशीन व सिटीस्कॅन मशीन नसल्याबाबत**

**(४१) ८१४४८ (१९-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रुग्णालयात एक्सरे मशीन व सिटीस्कॅन मशीन नसल्यामुळे या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) तसेच या रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, हिंगणघाट, जि.वर्धा येथे एक्स-रे मशीन कार्यान्वित आहे. वैद्यकीय उपकरणांच्या प्रचलित निकषानुसार उपजिल्हा रुग्णालयांना सी.टी. स्कॅन मशीन मंजुर नसल्याने उपजिल्हा रुग्णालय, हिंगणघाट येथे सी.टी. स्कॅन मशीन उपलब्ध नाही. तथापि, ज्या रुग्णांना सी.टी. स्कॅन करण्याची गरज भासते, अशा रुग्णांना मोफत रुग्णवाहिकेद्वारे जिल्हा रुग्णालयात संदर्भित करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, हिंगणघाट, जि.वर्धा येथील मंजूर १०५ पदांपैकी ८१ पदे भरलेली आहेत. सदरहू रुग्णालयातील उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) गट-अ संवर्गातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त पदे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निवड समितीमार्फत जिल्हास्तरावरुन भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या असून सदर पदांच्या लेखी परिक्षा घेण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धाबा (ता.बार्शीटकली, जि.अकोला) येथील सिंचन तलावामध्ये पाणी साठवण होत नसल्याबाबत**

**(४२) ८१५५९ (१७-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाबा (ता.बार्शीटकली, जि.अकोला) येथे सुमारे ४० वर्षा पूर्वी जिल्हा परिषद सिंचन तलाव बांधला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तलावामध्ये पाण्याची साठवण व्हावी यासाठी शासनाने गेल्या वर्षी ६० लक्ष रुपये खर्च करून सुद्धा तलावामध्ये एक बुंद पाण्याची साठवण होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०८-२०१७) :**(१) होय.

(२) अशंतः खरे आहे.

सन २०१६-१७ च्या पावसाळ्यामध्ये सदर तलावामध्ये लघुत्तम संचय पातळी पेक्षा१.०० मिटर जास्त पाणीसाठा निर्माण झाला होता. यावर्षी तलावात पुर्णसंचय पातळी पर्यंत पाणी साठा निर्माण झाला नाही. यावर्षी तलावामध्ये ३३ टक्के पाणीसाठा निर्माण झाला होता. उपविभागीय अभियंता, लघुसिंचन उपविभाग जि.प.बार्शिटाकळी यांनी माहे डिसेंबर २०१६ मध्ये पाहणी केली असतां, लघुत्तम संचय पातळीपेक्षा ०.५० मिटर पाणीसाठा उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर तलाव दुरुस्तीचे काम मे २०१६ मध्ये भौतिकदृष्ट्या पुर्ण झाले आहे व अद्याप पर्यंत कंत्राटदारास अंतीम देयक अदा केलेले नाही.

(३) नाही

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन पारगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) तात्यासाहेब कोरे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मेरीट प्रमाणे प्रवेश न दिल्याबाबत

**(४३) ८१९११ (१९-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय नवीन पारगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना गुणवत्तेप्रमाणे प्रवेश न देता नियमबाह्यपणे विद्यार्थ्यांकडून अतिप्रमाणात पैसे घेऊन प्रवेश देणे, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्राचार्यांच्या मनमानी कारभारामुळे त्रस्त झाली असून कामाव्यतिरिक्त इतर कामे देणे तसेच त्यांना वेळेचे बंधन नसून अतिकाळ कामे देऊन मानसिक त्रास देणे, तुटपुंजे वेतन देणे, कोणी त्यांचे ऐकले नाहीतर त्याच्यावर नाहक दोष ठेवून निलंबित करणे असे अन्यायकारक प्रकार मागील पाच वर्षापासून होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उपरोक्त महाविद्यालयाच्या प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ.प्रिती बसगौडा पाटील यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांच्याकडे महाविद्यालयाची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी तक्रारीची दखल घेऊन महाविद्यालयाशी संपर्क साधून त्याचे म्हणने ऐकून घेऊन डॉ.पाटील यांच्यावर झालेला अन्याय दूर करुन त्यांना सेवेत घेऊन त्यांची थकबाकीची रक्कम देण्याबाबतचा अहवाल महाविद्यालयास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विद्यापीठ, नाशिक यांच्या अहवालाच्या अनुषंगाने महाविद्यालयाने कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याने डॉ.प्रिती पाटील यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेकडे याबाबतचे निवेदन दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महाविद्यालयाच्या प्राचार्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच दंतमहाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ.पाटील यांना सेवेत घेणे व थकीत रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. प्राचार्यांच्या मनमानी कारभाराबाबत डॉ.प्रिती पाटील यांचे निवेदन आणि कमी वेतनासंदर्भात श्री. सुरेश चौहान या कर्मचाऱ्याने दाखल केलेली तक्रार विद्यापीठास प्राप्त झाली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) दिनांक ३०/०१/२०१७ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने विद्यापीठाने दिनांक २२/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये डॉ.प्रिती पाटील यांना महाविद्यालयाविरुध्द सेवाविषयक बाबींबाबत त्यांचे गाऱ्हाणे असल्यास, विद्यापीठ निदेश क्र.०५/२०१२ मध्ये विहीत केलेल्या तरतुदीनुसार गाऱ्हाणी अपील दाखल करण्याबाबत कळविले आहे. तसेच, दिनांक ०७/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये डॉ.प्रिती पाटील यांना विद्यापीठाच्या दिनांक २१/०५/२०१४ रोजीच्या निर्णयाप्रमाणे सेवेत रुजू करुन घेतले आहे किंवा कसे व वेतनाच्या थकबाकीची रक्कम अदा केली आहे किंवा कसे, याबाबत महाविद्यालयाकडून सविस्तर खुलाश्याची मागणी करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील समुद्र किना-यावरील खारफूटीची वने नष्ट होत असल्याबाबत

**(४४) ८२०१५ (०६-०५-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समुद्र किना-यावरील खारफूटीची वने नष्ट होत चालली असून समुद्रात तांबे, अल्युमिनियम, नायलॉन सूत, जहाजातून समुद्रात खराब ऑईल, किटकनाशके, केमिकल्स अशी अनेक प्रदूषके टाकल्यामुळे सागरी जीवसृष्टीवर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सागरी जीवसृष्टी वाचविण्याकरिता शासनाने विशेष उपाययोजना करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त उपाययोजना केव्हापासून राबविण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०८-२०१७)** :(१) राज्यातील समुद्र किनारी भागातील कांदळवन क्षेत्र कमी न होता ते वाढल्याचे भारतीय सर्वेक्षण संस्था, डेहराडून यांनी सन २०१६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालामध्ये नमूद केलेले आहे. तथापि, समुद्रात सोडण्यात येणाऱ्या विविध प्रदुषकामुळे सागरी जीव सृष्टीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो, ही वस्तूस्थिती आहे.
(२) राज्यात कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता पुढीलप्रमाणे पावले उचलण्यात आलेली आहेत:-

१. तटीय क्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता सन २०१२ मध्ये कांदळवन कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

कांदळवन कक्षांतर्गत मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि मिरा - भाईंदर क्षेत्रातील कांदळवनाचे प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता सन २०१३ मध्ये मुंबई कांदळवन संधारण घटकाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

२. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका ३२४६/२००४ मध्ये दिलेल्या आदेशानुसार राज्य शासनाकडून कांदळवनाला वैधानिक दर्जा व संरक्षण प्राप्त होण्याकरिता सरकारी जमिनीवरील कांदळवन क्षेत्र “राखीव वने ” म्हणून आणि खाजगी जमिनीवरील कांदळवन क्षेत्र “वने” म्हणून घोषित करण्यात येत आहेत. त्यानुसार राज्यातील तटीय सात जिल्ह्यातील १५०८७ हे. क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अंतर्गत राखीव वने म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे.

३. मुंबई कांदळवन संधारण घटकाकडून मुंबई व मुंबई उपनगरातील नगरपालिका व पोलिसांच्या सहकार्याने विविध ठिकाणी अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

४. UNDP प्रकल्पांतर्गत कांदळवन क्षेत्रामध्ये असणारा कचरा, प्लॅस्टीक व इतर घनकचरा काढून क्षेत्र स्वच्छ करण्याकरिता विविध ठिकाणी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

५. UNDP प्रकल्पांतर्गत सागरी जीवसृष्टी व जैवविविधता यांचे संवर्धन करण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहेत. सदर प्रकल्पांतर्गत समुद्र प्रवाळ, पानमांजर, समुद्री साप, देवमासा, डॉल्फीन यांचे संवर्धन करण्याकरिता कार्यक्रम हाती घेतलेले आहेत.

६. तसेच समुद्री कासवे यांचे संवर्धन करण्याकरिता रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील किनारी भागात प्रजनन काळात कासवे अंडी घालत असलेली ठिकाणे शोधून त्यांचे संरक्षण करण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत अशी ३२ ठिकाणे निश्चित करुन त्याची देखरेख करुन त्यांचे संरक्षण केले जात आहे.

(३) कांदळवन कक्षाची निर्मिती नंतर सन २०१३ पासून कांदळवन व सागरी जैवविविधता यांचे संरक्षण व संवर्धन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ३३ महाविद्‌यालय किंवा संस्थेमार्फत अनधिकृत पद्धतीने परिचारिकांना प्रशिक्षण दिले जात असल्याबाबत**

**(४५) ८२२४७ (१९-०४-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात ३३ महाविद्‌यालय किंवा संस्थेमार्फत आरोग्य विभागातील परिचारिकांना अनधिकृत पद्धतीने परिचारिका प्रशिक्षण दिले जात असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच परिचारिका अधिकृत प्रशिक्षित नसल्याने रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सन २०१५ मध्ये महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडे बोगस महाविद्‌यालयांची माहिती मागितली असता मागील २ वर्षात त्यांच्याकडे एकही बोगस महाविद्‌यालय किंवा संस्थेची तक्रार आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या अनधिकृत पद्धतीने परिचारिकांना प्रशिक्षण देणाऱ्या महाविद्‌यालय किंवा संस्थावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०९-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे नांदणी (ता.मुरबाड, जि.ठाणे) या गावातील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत बांधलेली १४ शौचालये जमीनदोस्त केल्याबाबत**

**(४६) ८२८५५ (२०-०४-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवपे हद्दीतील मौजे नांदणी (ता.मुरबाड, जि.ठाणे) या गावातील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत बांधलेली १४ शौचालये श्री.जी.के.तोमर, वनपरिक्षेत्र अधिकारी, मुरबाड यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास जमीनदोस्त केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शौचालयाचे बांधकाम शासकीय, खाजगी किंवा वनविभागाच्या जागेवर करण्यात आले आहे काय व बांधकाम करण्यापूर्वी संबंधितांची पूर्व परवानगी घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिका-याविरुध्द कोणती कारवाई केली व शौचालय पाडल्याने नागरीकांच्या शौचालयासाठी कोणती पर्यायी व्यवस्था केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

मौजे नांदणी, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील संरक्षित वन, सर्व्हे क्र.२८ मध्ये वन विभागाच्या जागेवर सदर शौचालयांचे बांधकाम करण्यात आले होते. सदर शौचालयांचे बांधकाम करण्याकरिता वन विभागाची परवानगी घेण्यात आली नव्हती.

(३) व (४) शौचालयांचे बांधकाम वन विभागाच्या जागेवर केल्याचे निदर्शनास आल्याने वनपाल, कोला, मुरबाड पश्चिम वनक्षेत्र यांनी दिनांक ०५/०१/२०१७ रोजी वनगुन्हा नोंदविला आहे. वन विभागाने केलेली कार्यवाही नियमानुसार असल्याने अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालयाच्या बांधकामाकरिता वनजमीन वळती करण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक ०८/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तथापि, मौजे नांदणी, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील संरक्षित वन, सर्व्हे क्र.२८ मधील वनक्षेत्रात शौचालयाचे बांधकाम करण्याकरिताचा प्रस्ताव अद्याप वन विभागास प्राप्त झालेला नाही.

---

## मौजे दुधोडी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील साठवण तलावाची भिंत व सांडवाची झालेली दुरवस्था

**(४७) ८३४५१ (२०-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दुधोडी (ता.भुम, जि.उस्मानाबाद) येथील तलावाची क्षमता मोठी असून या तलावामुळे पाथरुड, दुधोडी व नान्नजवाडी या गावातील शेकडो एकर जमिन ओलीताखाली येते परंतु तलावाची भिंत व सांडवा नादुरुस्त असल्याने तलाव फुटण्याची शक्यता निर्माण झाली असल्यामुळे त्याची लवकर दुरुस्ती करावी अशी विनंती लोकप्रतिनिधींनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास,पाहणीनुसार तलावाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०८-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) लघुसिंचन (जलसंधारण) प्रकल्पांची देखभाल व दुरूस्ती करण्यासंदर्भात अनुसरावयाची कार्यपद्धती शासनाने दिनांक ७/११/२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये निर्धारित केली आहे.त्यानुसार विषयांकित दुरूस्ती कामासंबंधित परिपुर्ण प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना “अधिक्षक अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद” यांना दिनांक २८ जून, २०१७ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार प्राप्त होणा-या प्रस्तावांवर निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ५०% पेक्षा अधिक मुले कुपोषित आणि दारिद्र्यरेषेखाली असल्याबाबत**

**(४८) ८३६९३ (१५-०४-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५०% पेक्षा अधिक मुले कुपोषित आणि दारिद्र्यरेषेखाली असल्याचे माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी मा.न्यायालयाने शासनाला आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कुपोषणाची स्थिती दर्शविणारा तपशील खालील प्रमाणे आहे.

(माहे जानेवारी-२०१७ चे MPR वरुन)

| वजन घेतलेली एकुण मुले | सर्वसाधारण | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ६१२७१५३ | ५४८५२१८ | ५५६४८३ | ८५४५२ | १.४ |

(२) होय, मा. उच्च न्यायालयाने दि. ०३.१२.२०१६ रोजी मा. मुख्य सचिवांनी शासन राबवित असलेल्या योजनांबाबत व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सर्व आदेशांबाबत सविस्तर शपथपत्र सादर केलेले आहे. तसेच दि.१ मार्च, २०१७ रोजी आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग यांनी सविस्तर माहितीचे सादरीकरण मा.उच्च न्यायालयास सादर केले आहे. मा.उच्च न्यायालयाने याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

(३) व (४) कुपोषणाला आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने केलेल्या व करण्यात येत असलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडयातील ०-६ वयोगटातील बालके, गर्भवती, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना-
१) पुरक पोषण आहार २) आरोग्य तपासणी ३) संदर्भ सेवा ४) अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण ५) लसीकरण ६) आहार व आरोग्य इ. सेवा नियमित देण्यात येत आहेत.

---

**मौजे पारगड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील घरे व जमिनी नावावर करुन देण्याची मागणी**

**(४९) ८७०४५ (१६-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पारगड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील घरे व मोकळी जागा ग्रामस्थांच्या नावे करण्याची मागणी उपवनसंरक्षक यांना एका राजकीय पक्षातर्फे माहे मे, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे. अशी मागणी एका राजकीय पक्षातर्फे उप वनसंरक्षक, कोल्हापूर यांचेकडे करण्यात आली आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी पूर्वी चौकशी होऊन ५५ घरांचे दावे मंजूर असून वनक्षेत्र त्यांचे ताब्यात दिलेले आहे. पारगड किल्ला हा मौ. मिरवेल सं.नं.२१ मध्ये असून सदरच्या क्षेत्राचा वैधानिक दर्जा राखीव वन असा आहे. राखीव वनाचा दर्जा बदलावयाचा असल्यास तसेच वन विभागाचा असलेला ताबा हस्तांतरित करुन गावठाण घोषित करावयाचे झाल्यास प्रथमत: महाराष्ट्र जमीन महसूल संहीता, १९६६ मधील कलम १२२ नुसार उप अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडून रितसर मोजणी व नकाशे तयार करणे आवश्यक आहे. तसेच तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद किंवा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांच्याकडून प्रकल्प यंत्रणा म्हणून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत गावठाण क्षेत्राच्या निर्वणीकरणाचा प्रस्ताव प्राप्त होताच वन विभागाकडून केंद्र शासनाच्या मान्यतेच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तातडीने करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गिरगाव (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) येथील तेंदुपत्ता संकलनासाठी परराज्यात गेलेल्या दोन मजुरांच्या उपचाराअभावी झालेला मृत्यू

**(५०) *८८३८०* (११-०८-२०१७). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरगाव (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) येथील दोन मजूर तेंदूपत्ता संकलनासाठी शितपूर जिल्ह्यातील (मध्यप्रदेश) अमरकी येथे गेले असता उपचाराअभावी मृत्यू झाल्याचे दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेत संबंधित कंपनी व तेंदूपत्ता कंत्राटदारावर मजुरांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असताना देखील मजुरांवरील उपचारात दिरंगाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेची चौकशी करून पिडीत कुटुंबाला आर्थिक मदत तसेच दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०९-२०१७) :**(१) मौजा गिरगांव (ता.नागभिड, जि.चंद्रपूर) हे गांव तळोधी परिक्षेत्रातंर्गत येत असून तेंदुपत्ता संकलनाकरीता परराज्यात गेलेल्या मजूरांना मृत्यू झाल्याबाबतची तक्रार / निवेदन वनविभागास प्राप्त झाले नाही.

(२), (३) व (४) ब्रम्हपुरी वनविभागातंर्गत येणा-या गावांमधील मजूर तेंदुपाने संकलना करीता इतर राज्यात जातांना-बाबतची कोणतीच माहिती वनविभागाकडे उपलब्ध करुन देण्यात येत नाही. सदर बाब वन विभागाचे अखत्यारीत येत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.